MHNS190014352022

| | |
|---|---|
| नोंदणी दिनांक | : ०१/०९/२०२२ |
| निकाल दिनांक | : ३०/०३/२०२६ |
| कालावधी | : वर्ष महिने दिवस |
| | ०३ ०६ २९ |

**<u>सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, येवला यांचे न्यायालयात</u>**

**<u>पिठासीन अधिकारी : श्रीमती डी.एम.गुलाटी</u>**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १९४/२०२२</u>** **<u>निशाणी क्र. ३१</u>**

**बँक ऑफ बडोदा**
**तर्फे जनरल मुखत्यार**
**श्री. अनिरुध्द भास्कर टेमकर,** **वादी**
वय — ३२, धंदा – नोकरी,
रा. बँक ऑफ बडोदा, नैताळे
शाखा, ता. निफाड, जि नाशिक

**<u>विरूध्द</u>**

**जुबेर ताहेर सैयद,**
वय — ३७, धंदा – व्यापर,
रा. प्लॅाट नं. ३७ असेीएस–१३ **प्रतिवादी**
जहागीरदा कॉलनी, कोर्ट रोड,
येवला, ता. जि. नाशिक.

**दावा – रक्कम रुपये ३,०६,४४२.६२ पैसे व व्याजाचे वसुलीकरीता.**

........................................................................................................................

वादी करीता : ॲड. जी.एन.कुलकर्णी

प्रतिवादी करीता : एकतर्फा

........................................................................................................................

## न्यायनिर्णय

## घोषीत दिनांकः ३०.०३.२०२६

वादी बँक ऑफ बडोदा ही राष्ट्रीयकृत बँक असुन तिचे मुख्य कार्यालय वर नमुद पत्यावर आहे. वादी बँकेने पुर्वीच्या देना बँकेने दाव्यासंबंधीचे कामकाजाचे पाहण्याकामी अनिरुध्द भास्कर टेमकर यांचे लाभात जनरल मुखत्यारपत्र दि. १६.०३.२०१७ रोजी लिहुन दिले असुन त्या प्राप्त अधिकारात वादी बँकेचे वतीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

२. **वादीचे थोडक्यात कथन की,**

वादी बँकेमध्ये देना बँकेचे एकंदरीत शासनाचे अधिसुचनेनुसार विलनीकरण करण्यात आलेले आहे. सदरचे विलनीकरणाच्या अधिसुचनेत दि. ०२.०१.२०१९ रोजी भारतीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेले आहे. त्यानुसार विलनीकरण झालेले बँकेचे सर्व हक्क, अधिकार, हितसंबंध व सर्व कारभार सदर वादी बँकेत समाविष्ठ करण्यात आलेले आहे. त्यानुसार वादी बँकेस कर्ज वसुल करण्याचे हक्क व अधिकार प्राप्त झाले आहे. प्रतिवादीने वादी बँकेकडुन प्रधानमंत्री मुद्रांक योजना या योजने अतंर्गत बांगडया व कटलेरी व्यवसायासाठी कर्ज मिळण्यासाठी दि. १३.०६.२०१७ रोजी अर्ज केला

होता. प्रतिवादी यांच्या कर्ज मागणी अर्जास मंजुर करुन वादी बँकेने प्रतिवादी यांना दि. १७.०६.२०१७ रोजी २ लाख रुपये व्यवसाय करण्यासाठी कर्ज मंजुर केले. सदर कर्ज मंजुरीबाबतचे शर्ती व अटीचे पत्र प्रतिवादीला देण्यात आले. त्या शर्ती व अटी प्रतिवादी यांनी मान्य व कबुल करुन सहया करुन वादी बँकेचे लाभात करुन दिलेले आहे व त्याप्रमाणे कर्ज रक्कम उचलली आहे.

३. प्रतिवादी यांचे कर्ज खाते क्र. ४२९२०५५१००२७९ असा आहे. सदर रकमेचे व्याज दर ८.३० द.सा.द.शे असा निश्चित करण्यात आलेले होता. तसेच, रिर्झव्ह बँक ऑफ इंडिया यांच्या वेळोवेळी होणा–या मार्गदर्शनाप्रमाणे व्याजदारात बदला प्रमाणे व्याज देण्याचे प्रतिवादी यांनी कबुल केलेले होते व आहे.

४. सदर कर्जाची मुदत ही एक वर्ष होती व परतफेड ही प्रतिवादी याने वादी मागणी करतील तेव्हा व्याजासह करावयाचे होते. प्रतिवादीच्या नावाने वादी बँकेमध्ये खाते आहे. त्यात झालेल्या नोंदी रोज लिहल्या जातात. प्रतिवादी यांनी कर्जाचे अगर व्याजाची परतफेड ही कधीही वेळेवर केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी हे वादीचे थकबाकीदार झालेले आहे. प्रतिवादीने वादीस जो वेळोवेळी वसुल दिलेला आहे तो वसुल, व्याजाची रक्कम व इतर खर्च या प्रतिवादीच्या खात्यात मांडलेला आहे. वादीने प्रतिवादी यांना कर्जाची परतफेड करण्याबाबत वेळोवेळी सुचविले असता प्रतिवादीने टाळाटाळा केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी हे बँकेचे थकबाकीदार झालेले आहे.

५. प्रतिवादी यांनी दि. १७.०६.२०१७ रोजी केलेल्या कर्जाची कबुली करीता वादी बँकेच्या लाभात कर्ज मान्य असल्याबाबत कबुली पत्र दि. ०४.०९.२०१९ रोजी लिहुन दिलेले असुन व प्रतिवादी यांनी घेतलेले कर्ज व बाकी कर्ज मान्य व कबुल केलेले आहे.

६. वादी यांनी प्रतिवादी यांना वादीच्या वकिलांमार्फत दि. १०.०२.२०२२ रोजी नोटीस पाठवुन प्रतिवादी यांना रक्कम परतफेड करणेबाबत कळविले आहे. सदर नोटीस प्रतिवादी यांनी घेण्यास जाणुनबुजुन टाळाटाळ केलेली आहे. प्रतिवादी यांना नोटीसची माहिती झालेली होती. तरी देखील नोटीस नुसार प्रतिवादी यांनी रक्कम भरलेली नाही.

७. वादीस प्रतिवादीकडुन दि. १५.०१२.२०१७ अखेर पावेतो रक्कम रुपये. २,०२,३१३.२५ पैसे तसेच, खाते एन.पी.ओ. झाल्यापासुन म्हणुन दि. १५.०१२.२०१७ पासुन खात्यात न आकारलेले व्याजाची रक्कम रु. १,०४,१२९.३७ पैसे एकुण रक्कम रु. ३,०६,४४२.६२ पैसे व दि. ०२.०७.२०२२ पासुनचे पुढील व्याजा इतकी रक्कम येणे बाकी आहे. म्हणुन प्रस्तुत दावा दाखल करण्यात आलेला आहे.

८. प्रतिवादी यांना बजावणी होवुन देखील दाव्याकामी हजर झाले नाही, त्यामुळे त्यांच्या विरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला.

९. खालील मुददे माझे अवलोकनार्थी उपस्थित होतात. त्यावरील कारणमिमांसा करुन खालीलप्रमाणे निष्कर्ष सदर न्यायालय देत आहे –

| **अ.क.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी हे शाबीत करू शकले काय की, प्रतिवादीने बँकेच्या मान्य केलेल्या अटी व शर्तीनुसार २,००,०००/-, रुपये कर्ज घेतले होते ? | होय. |
| २. | वादी हे शाबीत करू शकले काय की, प्रतिवादीने कर्जाची रक्कम परतफेड केली नाही ? | होय. |
| ३. | वादी हे शाबीत करू शकले काय की, वादी हा प्रतिवादीकडून | होय. |

| | | |
|---|---|---|
| | व्याजासह रु. ०३,०६,४४२.६२ पैसे वसूल करण्यास पात्र आहे का? | |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र १ ते ४ करीता :–**

१०. वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरीता विचारविनिमयासाठी एकत्रीत घेतले आहेत.

११. वादीने भारतीय पुरावा कायदयानुसार दाव्यातील तथ्य सिध्द करण्याकरिता वादी अनिरुध्द भास्कर टेमकर यांना नि.क्र. १७ वर तपासले.

१२. वादीने खालील कागपत्रावर भर दिलेला आहेः–

| अ.क्र. | नाव | निशाणी |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीने कर्ज मागणीसाठी केलेला अर्ज. | १८ |
| २. | कर्ज मंजुर आदेशाची प्रत. | १९ |
| ३. | डि.पी.नोट | २० |
| ४. | हायपोथीकेशन करारनामा | २१ |
| ५. | लेटर ऑफ कन्टेन्युइंग सिक्युरिटी दस्त. | २२ |
| ६. | कम्पोझीट अंडरटेकिंग कम डिक्लेरेशन दस्त | २३ |
| ७. | खातेउतारा | २४ |

| | | |
|---|---|---|
| ८. | लेटर ऑफ अक्नॉलॉजमेन्ट ऑफ डेब्ट | २५ |
| ९. | प्रतिवादीला वकिलामार्फत नोटीसची स्थळ प्रत | २६ |
| १०. | नोटीस प्रतिवादीने स्वीकारली नसलयाने पोस्टाचे पाकीट परत आलेली प्रत | २७ |
| ११. | पॉवर ऑफ अटॉर्नी | २८ |

१३. वादीने नि.क्र.२९ वरी पुरसिस देवुन पुरावा बंद केला.

१४. सदर दाव्यामध्ये प्रतिवादीने पोहच होवुन ते हजर झालेले नाही व दावा हा प्रतिवादी यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आलेला आहे.

१५. वादीने दाव्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी वादी बँकेकडुन प्रधानमंत्री मुद्रांक योजने अंतर्गत बांगडया आणि कटलेरीच्या व्यवसायासाठी कर्ज मिळण्यासाठी दि. १३.०६.२०१७ रोजी अर्ज केला होता. प्रतिवादी यांचे कर्ज मागणीचा अर्ज मंजुर करुन वादी बँकेने प्रतिवादी यांना दि. १७.०६.२०१७ रोजी २ लाख रुपये व्यवसाय करण्यासाठी कर्ज मंजुर केले. सदर कर्ज मंजुरीबाबत प्रतिवादी यांना शर्ती व अटीचे पत्र दिले. सर्व शर्ती व अटी प्रतिवादी यांनी मान्य व कबुल करुन वादी बँकेच्या लाभात दि. १७.०६.२०१७ रोजी कर्ज मंजुर पत्र, डिमांड प्रॉमेसेरी नोट, हायपोथीकेशन करारनामा, कम्पोझीट अंडरटेकिंग कम डिक्लेरेशन व लेटर ऑफ कन्टेन्युइंग सिक्युरिटी करुन दिली. प्रतिवादी यांचे कर्ज खाते क्र. ४२९२०५००००००२७९ असा आहे. सदर कर्ज रकमेचा व्याज दर ८.३० द.सा.द.शे असा निश्चित करण्यात आलेला होता. सदर कर्जाची मुदत ही एक वर्ष होती व परतफेड ही प्रतिवादी याने वादी मागणी करतील तेव्हा व्याजासह करावयाचे होते. प्रतिवादीच्या नावाने वादी बँकेमध्ये

खाते आहे. त्यात झालेल्या नोंदी रोज लिहल्या जातात. प्रतिवादी यांनी कर्जाचे अगर व्याजाची परतफेड ही कधीही वेळेवर केलेली नाही. प्रतिवादीने वादीस जो वेळोवेळी वसुल दिलेला आहे तो वसुल, व्याजाची रक्कम व इतर खर्च या प्रतिवादीच्या खात्यात मांडलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी हे बँकेचे थकबाकीदार झालेले आहे.

१६. सदर दाव्याला अनुसरुन वादीने आपलया पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १७ वर दाखल केलेले आहे. सदर पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात वादी यांनी दाव्या अनुसार कथन केलेआहे. वादीने दाखल केलेले पुराव्याचे प्रतिज्ञापत्रास प्रतिवादीने हजर होवुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. प्रतिवादीने वादी बँकेकडुन प्रधानमंत्री मुद्रांक योजना या योजने अतंर्गत बांगडया व कटलेरी व्यवसायासाठी कर्ज मिळण्यासाठी दि. १३.०६.२०१७ रोजी अर्ज केला होता. प्रतिवादी यांच्या कर्ज मागणी अर्जास मंजुर करुन वादी बँकेने प्रतिवादी यांना दि. १७.०६.२०१७ रोजी २ लाख रुपये व्यवसाय करण्यासाठी कर्ज मंजुर केले. सदर कर्ज मंजुरीबाबतचे शर्ती व अटीचे पत्र प्रतिवादीला देण्यात आले. प्रतिवादी यांनी दि. १७.०६.२०१७ रोजी केलेल्या कर्जाची कबुली करीता वादी बँकेच्या लाभात कर्ज मान्य असल्याबाबत कबुली पत्र दि. ०४.०९.२०१९ रोजी लिहुन दिलेले असुन व प्रतिवादी यांनी घेतलेले कर्ज व बाकी कर्ज मान्य व कबुल केलेले आहे. वादीने आपल्या शपथपत्रात असे कथन केले आहे की, वेळोवेळी मागणी करुनही प्रतिवादीने कर्जाची व व्याजाची परतफेड केलेली नाही. सदर बाब खोडण्याचा प्रतिवादीने हजर राहुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादी बँकेकडुन कर्ज घेतले व त्याची परतफेड केली नाही या गोष्टीवर कोणीही विरोध न केल्यामुळे सदर बाब मान्य करणे योग्य होईल.

१७. दाव्यात कथन केल्याप्रमाणे वादीने प्रतिवादीकडुन वैयक्तीक व संयुक्तीक रक्कम रुपये ३,०६,४४२.६२ पैसे व दि. ०२.०७.२०२२ पासुनचे पुढील व्याज द.सा.द.शे. ८.३० टक्के दराने चक्रीवाढ व्याजदराप्रमाणे मिळावा ही मागणी केली आहे. प्रतिवादीने या दाव्यात हरकत घेवुन कुठेही असे कथन केले नाही की, वादी बँकेने प्रतिवादीला कर्ज दिलेले नाही. तसेच, प्रतिवादीने पैसे व त्यावरील व्याजही भरलेले आहे, असा कोणताही पुरावा अभिलेख पटलावर आलेला नाही. त्यामुळे वादी रक्कम रु. ३,०६,४४२.६२/–, मिळण्यासाठी पात्र आहे.

१८. प्रतिवादीने वादीचे पैसे व व्याज न भरल्यामुळे दि. ०२.०७.२०२२ पासुनचे पुढील व्याज द.सा.द.शे ८.३० टक्के दराने चक्रीवाढ व्याज दराप्रमाणे वसुल करुन मिळावा असे कथन केले आहे. सदर बाब प्रतिवादीने हजर होवुन नाकारलेली नाही. बँकेसोबत झालेला व्यवहार प्रतिवादीने हजर होवुन नाकारलेले नाही. म्हणुन वादी हा दि. ०२.०७.२०२२ पासुनचे पुढील साधा व्याज रक्कम वसुल होईपर्यंत मिळण्याकरिता पात्र आहे.

१९. वरील कथनानुसार वादी व व्याज रक्कम ३,०६,४४२.६२/–, व वसुलीकरीता पात्र आहे. तसेच, वादीचा दावा हा खर्चासह मंजुर करणे योग्य ठरेल. कारण वादीचे कथन खोडुन काढण्यासाठी कोणताही पुरावा अभिलेख पटलावर आलेला नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवते व मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करत आहेः–

## आदेश

१. दावा अंशतः खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादी बँकेला वैयक्तीक व संयुक्तीक रक्क्म रु. ३,०६,४४२.६२ पैसे (अक्षरी तीन लाख सहा हजार चारशे बेचाळीस रुपये बासष्ट पैसे) अदा करावी व साधे भविष्य

व्याज ८.३० टक्के द.सा.द.शे. दि. ०२.०७.२०२२ पासुन रक्कम वसुल होईपर्यंत अदा करावी.

३. येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करावा.

DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Digitally signed by DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Date: 2026.04.02 15:17:05 +0530

**ठिकाण– येवला** **(डी.एम.गुलाटी)**

**दिनांकः ३०.०३.२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, येवला,**

**जि. नाशिक.**